# मिरा भाईंद महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रसिद्धी पत्रक

- **मिरा-भाईंदर महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी 'रील्स स्पर्धेचे आयोजन**
- **कर्मचाऱ्यांच्या कला गुणांसाठी मंच उपलब्ध करणार**

मिरा-भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने आपल्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी 'रील्स स्पर्धे'चे आयोजन केले आहे. डिजिटल युगाच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांनी नव्या माध्यमांचा वापर समजून घ्यावा, त्यांच्यातील सर्जनशीलतेला वाव मिळावा आणि दैनंदिन कार्यप्रणालीत सकारात्मक ऊर्जा निर्माण व्हावी या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

रिल स्पर्धा ८ फेब्रुवारी २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत आयोजित केली जाणार आहे. महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी (लिपिक, संगणक चालक, सफाई कर्मचारी आणि इतर कर्मचारी वर्ग) या स्पर्धेत भाग घेऊ शकणार आहेत. या स्पर्धेच्या नियमावलीनुसार स्पर्धकांना किमान ३० सेकंद ते जास्तीत जास्त ५५ सेकंदांचा मराठी किंवा इंग्रजीत  उभ्या स्वरुपातील व्हिडीओ सादर करता येणार आहे. एका स्पर्धकाने एकच व्हिडीओ सादर करायचा असून तो ऑनलाईन अर्जाद्वारे पाठवायचा आहे. स्वच्छता, पर्यावरणीय उपक्रम, सांस्कृतिक वारसा, नागरिक सेवा व नाविन्यपुर्ण कल्पना या  विषयांना अनुसरुन एका घटकावर आधारित असला पाहिजे. महापालिकेच्या कोणत्याही गोपनीय उपक्रमाशी संबंधित व्हिडिओ बाह्य व्यक्ती किंवा संस्थेसोबत शेअर करण्यास सक्त मनाई आहे. तसेच कोणतेही सरकारी दस्तऐवज किंवा संवेदनशील माहिती व्हिडिओच्या स्वरूपात प्रसारित करता येणार नाही याची दक्षता घेण्यात येणार आहे.

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धाकांना  प्रमाणपत्र दिले जाणार असून **प्रथम क्रमांक पटकावणाऱ्यास ५ हजार** रोख पारितोषिक आणि स्मृतीचिन्ह, **द्वितीय क्रमांक पटकावणाऱ्यास ३ हजार** रोख पारितोषिक आणि स्मृतीचिन्ह **तृतीय क्रमांकावरील विजेत्यास १ हजार** रोख पारितोषिक आणि स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित केले जाणार आहे. तसेच उत्कृष्ट रील्स महापालिकेच्या अधिकृत सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित केल्या जाणार आहेत, ज्यामुळे कर्मचाऱ्यांच्या प्रतिभेला समाजापर्यंत पोहोचण्याची संधी मिळेल. महानगरपालिका प्रशासनाने कर्मचाऱ्यांना या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. डिजिटल माध्यमांतर्गत सर्जनशील अभिव्यक्तीला वाव मिळावा, यासाठी सर्वांनी उत्साहाने सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.